**रे.मु.नं.४७/२०१९ मध्ये नि.क्र.५ वर आदेश.**

**भिकु सुदाम शिलकर-३.**
**वि.**
**रविंद्र भिकु शिलकर-१.**

(सीएनआर क्र.**MHRG**13000-386-2019.)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, मौजे गोंडघर, ता. म्हसळा, जि. रायगड येथील मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | गट नं. | हि. नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|---|
| ०१. | १ | १ | ०-१९-०० | ३.६२. |
| ०२. | ९ | ३ | ०-०५-५० | ०.०४. |

वर नमुद मिळकती या एकमेकांच्याच्या लगत असल्यामुळे त्यास एकत्रित चतुःसिमा खालील प्रमाणे :-

पूर्वेस – श्री. धोंडु जान्या पयेर.
पश्चिमेस – श्रीमती कृष्णी रामभाऊ हातमकर यांची मिळकत.
दक्षिणेस – श्री. भिमा रामा तुरे यांची मिळकत.
उत्तरेस – श्री. सखाराम धोंडु शिलकर यांची मिळकत.

वरील प्रमाणे गट क्र.३३३ क्षेत्र ४–३०–५० हे आर मधील क्षेत्र ०–०९–८२ ही जमीन मिळकत अर्जाचा विषय आहे.

०३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वर नमुद मिळकती या श्री. भाग्या महादु उंडे यांच्या मालकीच्या वहिवाटीच्या होत्या. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे वडील श्री. सुदाम नारायण शिलक यांनी दिनांक ११/१२/१९८९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने रक्कम रुपये १६ हजार इतक्या रकमेत खरेदी घेतलेल्या होत्या. त्यानुसार सात बारा पत्रकी हक्कनोंद क्र.१९९० दाखल करण्यात येवून श्री. सुदाम नारायण शिलकर हे दावा मिळकतीचे मालक झालेले होते.

०४. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक ११/१२/१९८९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने दावा मिळकतींचा ताबा व कब्जा हा सुदाम नारायण शिलकर यांचेकडे आलेला होता व त्या मिळकतींमधून ते उत्पन्न घेत होते. त्यामध्ये त्यांची मालकी हक्काने ताबा – कब्जा व वहिवाट होती. वादी व प्रतिवादी क्र.१ हे सख्खे भाऊ बहीण आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे वडील सुदाम नारायण शिलकर यांचे दिनांक १०/०१/१९९५ रोजी निधन झाल्यानंतर अर्ज मिळकतींचे सात बारा पत्रकी सुदाम नारायण शिलकर यांची पत्नी जनीबाई सुदाम शिलकर व वादी व प्रतिवादी क्र.१ यांची नावे सन १९९६ मध्ये सात बारा पत्रकी दाखल झालेली होती.

०५. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ यांची आई व कै. सुदाम नारायण शिलकर यांची पत्नी जनीबाई सुदाम शिलकर यांचे दिनांक २०/०२/२००६ रोजी निधन झाले आहे. सुदाम

नारायण शिलकर यांचे मृत्यू पुर्वी व मृत्यू पश्चात दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे आपआपल्या सोयीनुसार एकत्रितरित्या व सामाईकरित्या कब्जे वहिवाट व कसवणुक होती. दावा मिळकतींमध्ये अर्जदार यांचा ताबा, कब्जा व वहिवाट होती.

०६. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, अशी परिस्थिती असताना दावा मिळकतींच्या सात बारा पत्रकी काही क्षेत्र हे कुडकी लघुपाठ बंधारे कालव्याकरीता संपादीत झालेले असून, संपादनाचा शेरा व इतर अधिकारात दाखल झाल्याचे पाहुन या संपादीत क्षेत्राचा मोबदला मिळविण्याच्या दृष्टीकोनातून निरनिराळे अर्ज संबंधित खात्याकडे करावे लागणार आहे. त्याकरीता दरवेळी सर्वांना संबंधित कार्यालयात हजर राहता येवू शकणार नाही, त्याकरीता वादींचे फोटोग्राफस व सहया प्रतिवादी क्र.१ ने को–या कागदावर घेतलेल्या होत्या. प्रतिवादी क्र.१ हा अर्जदार यांचा सख्खा भाऊ असल्या कारणामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून वादींनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे फोटोग्राफस देवून स्वतःच्या सहया व अंगठा को–या कागदांवर दिलेले होते.

०७. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीच्या सात बार पत्रकी दाखल झालेल्या संपादीत क्षेत्रा बाबतचा मोबदला व इतर कारवाई प्रतिवादी क्र.१ आपल्या वतीने व्यवस्थित जबाबदारी पार पाडेल असा रास्त विश्वास वादींचा प्रतिवादींवर होता. परंतु प्रतिवादी क्र.१ ने अर्जदार यांचेकडून घेतलेल्या फोटोग्राफस व को–या कागदांवर घेतलेल्या सहयांचा दुरुपयोग करुन दिनांक ०९/०१/२००७ रोजीचे खोटे व बनावट अखत्यार पत्राचा दस्त बनवून तो अखत्यार पत्राचा दस्त दिनांक १२/०१/२००७ रोजी तहसिलदार श्रीवर्धन यांच्या समक्ष केल्याचे दर्शवले आहे.

०८. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक १२/०१/२००७ रोजीच्या बोगस व बनावट अखत्यार पत्राच्या आधारे दावा मिळकतीं सदर्भात प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ चे लाभांत खरेदीखत नोंदवून बेकायदेशीर कृत्य केले होते. सदरचे नोंदणीकृत खरेदीखताचा दस्त क्र.१७३/२००७ दिनांक २५/०१/२००७ रोजी मा. दुय्यम निबंधक सो. श्रीवर्धन यांचे कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.

०९. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २५/०१/२००७ रोजीच्या खरेदीखताने जरी दावा मिळकतींच्या सात बारा पत्रकी प्रतिवादी क्र.२ चे नाव दाखल झाले असले तरी दावा मिळकतींचा प्रत्यक्ष ताबा व कब्जा हा सामनेवाला यास प्राप्त झालेला नाही. प्रतिवादी क्र.२ चे नोंदणीकृत खरेदीखताचा दस्त हा निव्वळ कागदोपत्री असून तो दिनांक १२/०१/२००७ रोजीच्या खोटा व बनावट बोगस अखत्यार पत्रांच्या आधारे करण्यात आलेला होता व आहे.

१०. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २५/०१/२००७ रोजीच्या प्रतिवादी क्र.२ च्या खरेदीखतास वादी यांची संमती नव्हती व सदरच्या नोंदणीकृत खरेदीखतास वादी संबंधित कार्यालयात उपस्थित नव्हते. नोंदणीकृत खरदेखतामध्ये दर्शविण्यात आलेली रक्कम रुपये ५० हजार चा मोबदला वादी यांनी कधीही स्विकारला नव्हता. त्यामुळे वादींच्या अपरोक्ष वादींची फसवणुक व विश्वासघात करुन प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात दावा मिळकतींचे खरेदीखत करुन दिलेले आहे.

११. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांचा दावा

मिळकतींमध्ये १/५ इतका हिस्सा असल्याने वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे संपादनाच्या मोबदल्याची मागणी केली. प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतींचे नोंदणीकृत खरेदीखत प्रतिवादी क्र.२ ने स्वतःचे लाभात करुन घेतले. सदर खरेदीखता बाबतची माहिती वादी यांना दावा मिळकतींचे सात बारा पत्रक पाहिले तेव्हा कळल्याचे कथन वादी यांनी केले आहे. दावा मिळकतींमध्ये आजमितीसही वादींची ताबे, कब्जा, वहिवाट व कसवणुकीस आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष ताबा व कब्जा वादींचा असल्याचे कथन वादी यांनी केले आहे.

१२. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे संपर्क साधुन दिनांक २५/०१/२००७ रोजीचे खोटे व बनावट खरेदीखत रद्दबातल करुन घ्यावे या करीता दिनांक १८/१०/२०१९ रोजी भेट घेतली होती. परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात करुन मिळकतींची विक्री करुन टाकतो अशी धमकी वादींना दिली. प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक २५/०१/२००७ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे दावा मिळकतींच्या सात बारा पत्रकी स्वतःचे नाव दाखल करुन घेवुन सात बारा पत्रकी दाखल झालेल्या नावाचा गैरफायदा घेवून दावा मिळकतींवर त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण केल्यास वादींच्या हक्कांवर बाधा येण्याची शक्यता असल्याचे कथन वादी यांनी केले आहे. तसेच वादींच्या दावा मिळकतींच्या शांततापुर्ण ताबे, कब्जे वहिवाटीस व कसवणुकीस हरकत, अडथळा होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वादी यांनी त्यांचा दावा मिळकतींमध्ये असलेला कायदयाने बसणारा १/५ हिस्सा निर्तुटक करुन दावा मिळकतींचे सरसनिरस धडेवाटप करुन मिळण्याकरीता वादी यांनी सदरचा दावा दाखल केला आहे.

१३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतींवर त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण केल्यास वादींच्या हक्कांवर संकोच निर्माण होवून दावा मिळकतींमधील प्रत्यक्ष ताबे कब्जास व वहिवाटीस हरकत, अडथळा निर्माण होवुन वादींचे पैशात न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल.

१४. वादी यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्याचे वाली वारस, नोकर चाकर, एजंट अगर अन्य कोणाही मार्फत दावा / अर्ज मिळकतीमध्ये वादींच्या हक्कास संकोच निर्माण होईल असे कृत्य करु नये. त्याच प्रमाणे दावा मिळकतीमधील वादींच्या शांततापुर्ण ताबे कब्जा वहिवाटीस हरकत, अडथळा निर्माण करु नये, तसेच दावा मिळकतींमध्ये त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत असा तुर्तातुर्त ताकीदीचा मनाई आदेश प्रतिवादी क्र.२ विरुध्द मिळण्याची विनंती केली आहे.

१५. प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्याचे कामी हजर होवून नि.क्र.२३ कडे त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक १२/०१/२००७ रोजीचे खरेदीखत करते वेळेस त्यांचीच फसवणुक झाली असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ यांना पैशांची आवश्यकता असल्या कारणाने त्यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्याकडून रक्कम रुपये ५० हजार कर्जाऊ घेतलेले होते. त्यावेळेस प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना गहाणखत नोंदणीकृत करुन घेतो असे सांगुन दिनांक २५/०१/२००७ रोजी मा. दुय्यम निबंधक साो. श्रीवर्धन यांचे कार्यालयात खरेदीखत दस्त क्र.१७३/२००७ स्वतःचे लाभात करुन घेतल्याचे कथन प्रतिवादी क्र.१ यांनी केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचीच फसवणुक झाल्यामुळे ते वादींना मोबदला देवू शकले नाही असे कथन केले

आहे. तसेच वादीच्या दावा कलम ११, १२, १३, १४, १५, १६ मध्ये नमुद केलेला मजकूर प्रतिवादी क्र.१ यास मान्य व कबुल असल्याचे कथन प्रतिवादी क्र.१ यांनी केले आहे.

१६. प्रतिवादी क्र.२ यांनी दाव्याचे कामी हजर होवून त्यांनी नि.क्र.२५ कडे त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल केले आहे. सदर प्रतिवादी यांनी दावा कलम २ व ३ मधील नमुद दावा मिळकती या सुदाम नारायण शिलकर यांच्या नावे मृत्यू पर्यंत होत्या ही बाब मान्य व कबुल केल्याचे कथन केले आहे. सुदाम शिलकर यांच्या हयातीत मिळकतीचा ताबा त्यांच्याकडे होता व ते उत्पन्न घेत होते हा मजकूर देखील मान्य व कबुल असल्याचे, तसेच सुदाम शिलकर यांच्या निधनाचे पश्चात वादी व त्यांची आई यांची नावे वारस दप्तरी लागली असल्याचे, दावा कलम ३ मध्ये नमुद केलेली वंशावळ योग्य व बरोबर असल्याचे कथन केले आहे.

१७. प्रतिवादी क्र.२ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर केलेला अखत्यार पत्राचा दस्त हा खरेदीखतात जोडलेला असून त्याचे निरीक्षण करता सदरच्या दस्तामध्ये वादी दाव्यात नमुद करतो असे कोणतेही काम नेमुन दिलेले नाही, जर का अशा कोणत्याही कारणाने सदरचे अखत्यार पत्र दिले असते तर तसा स्पष्ट उल्लेख सदरचे अखत्यार पत्रात करण्यात आला असता. तसेच सदरचे अखत्यार पत्राचे अवलोकन करता त्यात स्पष्टपणे सदरचे अखत्यार पत्राद्वारे जमीन विक्रीचे अधिकार सर्व वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यास दिल्याबाबत उल्लेख असल्याचे, तसेच सदरचे अखत्यार पत्र हे कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष साक्षांकीत करण्यात आले असल्याचे, सदर अखत्यार पत्रावर शिक्का असल्याचे, सदरचे अखत्यार पत्र पाहुन त्यांनी मिळकतींचे बाबत व्यवहार केला असल्याचे व तसा मोबदला त्यांनी प्रतिवादी यांना व वादी यांना दिला असल्याचे कथन केले आहे.

१८. प्रतिवादी क्र.२ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर खरेदीखत झाल्याचे पश्चात देखील हक्कनोंद क्र.१०१९ अन्वये त्यांचे नाव सात बारा सदरी दाखल झाले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ हे सदर मिळकतींचे प्रामाणिक व कायदेशीर खरेदीदार आहेत. सदर दस्ताचे नोंदणी क्र.१७३/२००७ बरोबर असल्याचे कथन प्रतिवादी क्र.२ यांनी केले आहे. दावा मिळकतीचा ताबे कब्जा व मालकी हक्क हा सदर खरेदीखत नोंदणीकृत झाल्या दिवशीच म्हणजेच दिनांक २५/०१/२००७ रोजीच प्रतिवादी क्र.२ यांना दिल्याबाबत पान क्र.६ कडे स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले आहे व त्याची स्पष्ट कल्पना वादी यांना असल्याचे कथन प्रतिवादी क्र.२ यांनी केले आहे. तसेच आजही सदर मिळकतीवर संपुर्ण ताबे कब्जा हा प्रतिवादी क्र.२ यांचाच असून तसा सात बारा देखील मागील १३ वर्षापासून त्यांच्या नावे आहे. केवळ अखत्यार पत्र दिलेले असल्याने सदरचे खरेदीखताचे वेळी प्रत्यक्षात वादी उपस्थित नव्हते याचा गैरफायदा सदरचे वादी यांना घेता येणार नसल्याचे कथन प्रतिवादी क्र.२ यांनी केले आहे. सदर दावा मिळकत जर का विकायची असती तर यापुर्वीच १३ वर्षात त्यांनी सांभाळली नसती. सदरची बाब देखील पुरेशी बोलकी असल्याचे कथन प्रतिवादी क्र.२ यांनी केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**वादीतर्फे युक्तीवाद खालील प्रमाणे** :-

१९. वादी यांनी सदरच्या अर्जावर असा युक्तीवाद केला की, त्यांची सदरच्या खरेदीखतास कधीही सहमती नव्हती. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन वादी यांना फसवले आहे. सदरची दावा मिळकत खरेदी करते वेळी प्रतिवादी क्र.२ ने कोणत्याही प्रकारे जाहीर नोटीस वर्तमान पत्रात

प्रसिध्द केलेली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चा दावा मिळकतीवर कोणताही हक्क अधिकार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे.

## प्रतिवादी क्र.२ तर्फे युक्तीवाद खालील प्रमाणे :-

२०. वरील युक्तीवादास उत्तर म्हणून प्रतिवादी क्र.२ ने असा युक्तीवाद केला आहे की, वादींनी तथाकथीत अखत्यार पत्राबाबत कोणतीही विनंती केलेली नाही. तसेच अखत्यार पत्र करण्यात आले याबाबत देखील वादींचे कोणतेही विरुध्दार्थी कथन नाही. प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कोठेही कथन केलेले नाही की, त्याला रक्कम रुपये ५० हजार मिळालेले नाही. सदरचा दावा व अर्ज दाखल करण्यासाठी कायदयानुसार असलेली मुदत देखील संपलेली आहे. दावा मिळकतीचा सात बारा उतारा पाहिल्यास दावा मिळकत प्रतिवादी क्र.२ च्या नावे दिसून येते. दावा मिळकतीचा मालकी हक्क केवळ प्रतिवादी क्र.२ चा आहे. तसेच दावा मिळकतीचा ताबे कब्जा देखील खरेदीखताच्या तारखेपासून प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे आहे. प्रतिवादी क्र.२ ने वादीचे विरुध्द अदखलपात्र गुन्हयाची नोंद केलेली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता सदरचा अर्ज नामंजूर होण्याची प्रतिवादी क्र.२ ने विनंती केली आहे.

२१. प्रस्तुत कामी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्या मुद्दयांवर खालील प्रमाणे कारणमिमांसेसह निष्कर्ष देण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | वादी त्यांचे बाजुने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द करतात काय ? | | .. नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | वाद अर्ज नामंजूर केलेस वादींचे अपरिमित नुकसान संभवते काय ? | | .. नकारार्थी. |
| ०३. | न्यायाचा तराजु वादींचे बाजुने आहे काय ? | | .. नकारार्थी. |
| ०४. | काय आदेश ? | | .. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

### <u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u> :–

(सदरचे मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने एकत्रित चर्चिले आहेत.)

२२. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथने व युक्तीवाद ऐकला. या सर्व बाबी वरुन असे दिसून येते की, दावा मिळकतीच्या सात बारा उता–यावर भोगवटदार या सदराखाली प्रतिवादी क्र.२ चे नाव आहे. तसेच इतर हक्क अधिकारामध्ये अन्य कोणाचेही नाव नाही. त्याच प्रमाणे गाव नमुना १२ याचे अवलोकन केले असता तेथे सन २०१६–२०१७, २०१७–२०१८, २०१८–२०१९ या कालावधीमध्ये प्रतिवादी क्र.२ हा स्वतः दावा मिळकत कसत होता असे दिसून येते. तसेच खरेदीखत क्र.१७३/२००७ हे दावा मिळकती बाबत केले असून त्यावर लिहून घेणार म्हणून प्रतिवादी क्र.२ चे नाव व लिहून देणार म्हणून वादी क्र.१ ते ४ व प्रतिवादी क्र.१ यांची नावे आहेत. महाराष्ट्र महसुल कायदयामधील कलम १५७ पाहता मालकी हक्क

दर्शविणारे (सात बारा उतारा व फेरफार) नोंदीबाबत गृहित तत्वे आहेत की, सदरच्या सर्व नोंदी या ख–या व बरोबर आहेत जोपर्यंत विरुध्द नोंद शाबीत होत नाही.

२३. वादींचे जरी असे कथन असले की त्यांच्याकडे व प्रतिवादी क्र.१ कडे दावा मिळकतीचा ताबे कब्जा आहे तरी देखील सदरची बाब शाबीत करण्यासाठी त्यांनी सकृतदर्शनी कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा पटलावर आणलेला नाही. सदरचा दावा दाखल करते वेळी म्हणजेच सन २०१९ साली दावा मिळकतीच्या सात बारा उतारा सदरी प्रतिवादी क्र.२ चे नाव दिसून येते. यावरुन सदयस्थितीत असा निष्कर्ष निघतो की, दावा मिळकतीचा ताबे कब्जा प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे आहे व अनेक वर्षापासून प्रतिवादी क्र.२ दावा मिळकतीची जमीन कसत आहे.

२४. वादींच्या कथनांप्रमाणे जरी असे तात्पुरते गृहित धरले की, प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ यांनी वादींची फसवणुक करुन दावा मिळकत प्रतिवादी क्र.२ यांच्या नावे तबदील केली तरी सदरच्या कथनांना पुराव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी वादींवर आहे व दाव्यातील दोन्ही बाजुंची साक्षी पुराव्यानंतर दावा मिळकतीची मालकी शाबीत होण्याजोगी आहे. सदयस्थितीमध्ये दोन्ही बाजुंच्या कथनांवरुन त्याच्या पृष्ठयर्थ दाखल केलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, दावा मिळकतीचा ताबे कब्जा प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे आहे.

२५. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा मिळकतींवर प्रतिवादी क्र.२ यांचे नाव सात बारा पत्रकी लागल्याने त्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकतींवर त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याची शक्यता दिसून येत नाही. कारण प्रतिवादी क्र.२ यांनी स्वतः दावा

मिळकतीतील त्यांचा ताबे कब्जा सुरक्षित ठेवण्यासाठी नि.क्र.२९ कडे वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द अर्ज दाखल केला आहे. यावरुन प्रतिवादी क्र.२ हा त्याचे ताबे कब्जा हस्तांतरीत करेल अशी शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे वादीने व्यक्त केलेली भिती अनाठायी असल्याचे निष्कर्ष निघतो. याकरीता  वादीचे पैशात न भरुन येणारे असे अपरिमित कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादी यांनी त्यांच्या लाभात प्रथमदर्शनी केस सिध्द केली असे म्हणता येणार नाही. तसेच दाव्याचे समतोलत्व वादीचे बाजुने आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे मी वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे सदरचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Sonali Dilip Javalgekar
Digitally signed by Sonali Dilip Javalgekar
Date: 2022.11.30 12:00:43 +0530

श्रीवर्धन.          ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक :– २५/११/२०२२.          दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

..